# उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर यांचे कार्यालय

क्र.अका/भू.सं./रा.म.मा.३५३j/कावी-१०३५/१९ दिनांक २४/१२/२०१९

## नमुना-३

### खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने व थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्यासाठी जमीन मालक किंवा हितसंबधीत व्यक्तीकडून हरकती/सुचना मागविण्याबाबत जाहीर नोटीस

### (भूसंपादन प्रकरण क्रमांक १२/४७/२०१७-१८ मौजा टोंगलापूर ता.चांदूरबाजार जि.अमरावती)

ज्या अर्थी, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोला यांनी **त्यांचे प्रस्ताव पत्र क्र.२४२१/PO२/२०१७ दिनांक १७/०७/२०१७** अन्वये अमरावती जिल्हयातील **राष्ट्रीय महामर्ग क्र.३५३J मोर्शी-चांदूरबाजार-अचलपूर मौजा टोंगलापूर ता.चांदूरबाजार** येथील महामार्गाचे दर्जोन्नतीचे कामाकरीता या सार्वजनिक प्रयोजनाकरिता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ व शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रं. संकिर्ण ०३/२०१५/प्रा.क्र.३४/अ-मंत्रलय, मुंबई दि. १२/०५/२०१५ तरतुदीस अनुसरुन शासन निर्णय क्रं. एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्रं.१२/अ २ दिंनाक २५/०१/२०१७ नुसार खासगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने केंद्रीय रस्ते व परीवहन मंत्रालय तर्फे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव **उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर** यांच्याकडे सादर केला आहे.

ज्या अर्थी, जिल्हाधिकारी **अमरावती** आदेश **पत्र क्रमांक मंडळ अधिकारी/वि.भु./स.अ/कावि-३८८ दिनांक १४/०८/२०१७** अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रं. एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्रं.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी, आता

१) मी, **संदीपकुमार श.अपार उपविभागीय अधिकारी अचलपूर तथा भूसंपादन अधिकारी,अचलपूर** जिल्हा **अमरावती** याव्दारे, अनुसूची-एक मध्ये नमूद खासगी क्षेत्रातील जमीन खासगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने, केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्रालय तर्फे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोला संबंधित खरेदी करावयाच्या जमिनीच्या जमिन मालकाचे नांव, गट नंबर व संपादन क्षेत्र इत्यादी तपशिल जाहीर नोटिस प्रसिध्द करित आहे. सदर जमिनीबाबत जमीन मालकांचे हिस्स्यावर हक्क हितसंबंध, दत्तक, वारसाहक्क, गहान,दान,बोजा बाकी, भाडेपट्टा,कर्ज,बक्षीसपत्र,जप्ती,करार-मदार अथवा इतर कोणताही हक्क असल्यास हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १० (दहा) दिवसांचे आत पुराव्यानिशी लेखी तक्रार कार्यालयीन वेळेमध्ये सकाळी ११.०० ते सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,**अचलपूर** या कार्यालयामध्ये समक्ष दाखल करावी.

२. जर मुदतीमध्ये कोणीही हक्क, हितसंबंध किंवा आक्षेप व हरकत दाखल केले नाही तर कोणाचेही काही एक म्हणणे किंवा हरकत नाही असे समजुन सदर मिळकतीवर कोणाचा बोजा आणि हितसंबंध नाही असे समजुन सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमच्या कार्यालयावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास सदर जमिन मालकांची मिळकत निर्बंध व बिनाजोखीमीची असल्याचे समजुन हे कार्यालय मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन यांचे वतीने खरेदीचा व्यवहार केव्हाही पूर्ण करेल व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत कायदेशिररित्या बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

३) प्रकल्पासाठी जमिन थेट खरेदी घेताना जिल्हाधिकारी समिती मार्फत भूमी संपादन, पुर्नवसन व पुनस्थापन करतांना वाजवी भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम २६ ते ३० व शेडयुल १ तसेच महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि. १२/०५/२०१५ व दि. ३०/०९/२०१५ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

४) संबंधित भूधारकाकडून शासनाच्या प्रस्तावित धोरणाप्रमाणे खाजगी जमिन खाजगी वाटाघाटी व्दारे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोला यांचे नांवे थेट खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिम रित्या स्विकारण्यास तयार असणेबाबतचे संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना या कार्यालयामार्फत संबंधित भूधारकांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

## अनुसूची (एक)

### भू.सं.प्र.क्रमांक :- १२/४७/२०१७-१८ मौजा टोंगलापूर ता. चांदुरबाजार जि.अमरावती

प्रकल्पाच्या आखणीमध्ये समाविष्ट (खरेदी घ्यावयाच्या) जमिनीचा तपशिल

| अ. क्र | जमिन मालकाचे नांव | गाव | स.नं./गट क्र. | ७/१२ प्रमाणे एकुण क्षेत्र (हे.आर) | पोटखराब क्षेत्र | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | महम्मद गफ्फार म.बाखर<br>शमिना अकतर म गफ्फार | टोंगलापूर | १४७ | ३.५५ | ०.१७ | ०.११ | पेरु-४, संत्रा-७६, सिताफळ-८, विहीर-१ |
| २ | रमेश मधुकरराव डवंगे | टोंगलापूर | १५० | १.७९ | ०.०० | ०.०१ | - |
| ३ | वामन उर्फ बाबाराव आत्माराम मानकर<br>(वहीवाटदार म.गफ्फार म.बाखर) | टोंगलापूर | १५१ | ०.७७ | ०.३० | ०.०८ | - |
| ४ | ओंकारराव वामनराव डाखोरे | टोंगलापूर | १५२पैकी | ०.४२ | ०.०० | ०.०८ | - |
| **एकूण :-** | | | | **६.५३** | **०.४७** | **०.२८** | |

**दिनांक : २७/१२/२०१९**
**ठिकाण : अचलपूर**

**(संदीपकुमार श. अपार)**
**उपविभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी, अचलपूर**